प्रेस नोट दि.०९/०३/२०२३

ओवली, ता. भिवंडी येथील ग्रामसेवक संजीव अमृत पाटील यांना लाच स्विकारतांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :– | नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी, ठाणे शहर<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र. ३८/१९.४५ वा. दिनांक ०९/०३/२०२३ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) लोकसेवक श्री. संजीव अमृत पाटील, वय–४९ वर्षे, पद–ग्रामसेवक, ओवली, ग्रमपंचायत, ता.भिवंडी, जि.ठाणे (वर्ग– ३) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | १५,०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | १०,०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांच्या रूमची व गाळयाची घरपट्टी लावून दिली याचा मोबदला म्हणून ओवली, ता.भिवंडी येथील ग्रामसेवक संजीव पाटील हे तकारदार यांच्याकडे सतत फोनद्वारे १५,०००/–रूपये लाचेची मागणी करीत असल्याने व तक्रारदार यांना लाच दयायची नसल्याने त्यांनी दिनांक ०९/०३/२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०३/२०२३ रोजी पडताळणी कारवाई केली असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामसेवक संजीव पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती रू. १०,०००/–लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर, लगेचच लाचेच्या सापळयाचे आयोजन केले असता ग्रामसेवक संजीव पाटील यांना ताडलीगांव, हनुमान मंदिर जवळ, भिवंडी येथे तक्रारदार यांचेकडून रु.१०,०००/– (दहा हजार रुपये) इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले असून लाचेची रक्कम ग्रामसेवक पाटील यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – मा.श्री.सुनिल लोखंडे, सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.अनिल घेरडीकर, सो.अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(स्वप्निल जुईकर)
पोलीस निरीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, ठाणे.

REDMI NOTE 9 PRO MAX
AI DUAL CAMERA